**भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय वाघोली पुणे**

**भूगोल विभाग उपक्रमशीलता**

**शैक्षणिक वर्ष २०२३-२४**

१. महाविद्यालयात भौतिक शास्त्र विभागातर्फे चंद्रयान ३ उपक्रमार्तंगत पोस्टर स्पर्ध्येचे आयोजन केले होते. यामध्ये भूगोल विभागातील द्वितीय वर्ष कला शाखेच्या ५ विद्यार्थींनी सहभाग घेतला. त्यांची नावे पुढील प्रमाणे :

१. प्रमिला कल्याण भोसले

२.हर्षदा राजू गावडे

३. सपना बबन सुर्वे

४. पूजा अंतुराम कांबळे

५. पायल संतोष साकोरे






**२. व्याख्यान : स्पर्धा परीक्षा तयारी**

आज शनिवार दिनांक २६/०८/२०२३ रोजी भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील भूगोल विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग आणि आय. क्यू. ए. सी. यांच्या संयुक्त विद्यमाने ' स्पर्धा परीक्षा तयारी ' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानास प्रमुख वक्ते म्हणून मा. श्री. सागर देशमुख, डी. वाय. एस. पी. हे लाभले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा संबंधित माहिती दिली. तसेच अभ्यासक्रमाविषयी माहिती सांगितली. त्याचबरोबरने अभ्यासाचे नियोजन कसे करावे, वेळेचे नियोजन कसे करावे, अभ्यासामधील एकाग्रता कशी वाढवावी याविषयी चर्चात्मक पद्धतीने मार्गदर्शन केले. हे करताना विद्यार्थ्यांच्या मनातील स्पर्धा परीक्षेविषयी असणाऱ्या शंका व प्रश्न हे जाणून घेऊन अगदी सोप्या शब्दात त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. यामधून काही नवीन विद्यार्थ्यांना देखील स्पर्धा परीक्षा व त्याचा अभ्यास करण्याची उत्सुकता निर्माण झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. ज्योतीराम मोरे यांनी केले. तसेच आलेल्या पाहुण्यांचा परिचय व स्वागत प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. माधुरी देशमुख यांनी केले. तसेच भारतीय जैन संघटनेच्या शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प विषयीची माहिती प्रकल्प व्यवस्थापक मा. श्री. सुरेश साळुंखे (बापू) यांनी

दिली. तसेच अध्यक्ष मनोगत आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यांनी केले. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभागाचे प्रा. सचिन कांबळे यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. निखिल आगळे यांनी केले. या कार्यक्रमाची सभागृहातील व व्यासपीठ तयारी व बैठक व्यवस्था शिक्षकेतर कर्मचारी श्री. नवनाथ बटुळे यांनी केली. तसेच कार्यालयातील अनेकांची या प्रसंगी मदत लाभली.या व्याख्यानाच्याप्रसंगी कला शाखेचे प्रमुख डॉ. सिद्धेश्वर गायकवाड, तसेच महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण प्रमुख डॉ. रमेश गायकवाड, मराठी विभाग प्रमुख डॉ. सहदेव चव्हाण, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सिद्धेश्वर सांगोळे, महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. समीर मोरे, वनस्पती शास्त्राचे प्रमुख डॉ. डी एन पाटील तसेच परीक्षा विभागातील श्री. बाजीराव आवटे सर देखील उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास १५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.








**कार्यक्रमाची प्रस्तावना करताना भूगोल विभाग प्रमुख डॉ. ज्योतिराम मोरे सर आणि उपस्थित विद्यार्थी**

**कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गायकवाड व . व्याख्यान देताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व वक्ते मा श्री. सागर देशमुख, डी. वाय. एस्. पी.**









**कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांचा परिचय करून देताना प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. माधुरी देशमुख व सहभागी विद्यार्थी**

३. महाविद्यालयात इतिहास विभागातर्फे भरडधान्य उपक्रमार्तंगत पोस्टर स्पर्ध्येचे आयोजन केले होते. यामध्ये भूगोल विभागातील द्वितीय वर्ष कला शाखेतील प्रमिला कल्याण भोसले विद्यार्थीने सहभाग घेतला.




४. महाविद्यालयात भौतिक शास्त्र विभागातर्फे पोस्टर स्पर्ध्येचे आयोजन केले होते. यामध्ये भूगोल विभागातील द्वितीय वर्ष कला शाखेच्या ५ विद्यार्थींनी पृथ्वीचे अंतरंग, हवेचे दाबपट्टे आणि भारतातील प्राकृतिक विभाग या विषयावर पोस्टर सादर केले. त्यांची नावे पुढील प्रमाणे :



१. प्राची प्रदीप जठार


२.हर्षदा राजू गावडे


३. सपना बबन सुर्वे

४. पूजा अंतुराम कांबळे

५. पायल संतोष साकोरे


**५. ग्राम सर्वेक्षण:** भूगोल विभागाच्या वतीने सर्व भूगोल स्पेशल विद्यार्थांनी बुधवार दि २८ फेब्रुवारी २०२४ रोजी **थेऊर** येथे ग्राम सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणाचा मूळ उद्देश हा ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक घटकांची माहिती मिळवणे हा होता. यासाठी लोकांचे शिक्षण, व्यवसाय, रोजगार, आरोग्य, घरातील व गावातील सोयीसुविधा इ. विषय डोळ्यासमोर ठेवून ग्राम सर्वेक्षणासाठी प्राथमिक सर्वेक्षण प्रश्नावली तयार केलेली होती आणि त्या प्रश्नावालींच्या माध्यमातून थेऊर परिसराची माहिती घेण्याचा प्रयत्न केला गेला. यासाठी सर्वेक्षणात सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांने किमान पाच घरातील कुटुंबाचा सर्वेक्षण केला. या सर्वेक्षण दरम्यान विद्यार्थ्यांनी गावातील लोकांशी सुसंवाद साधला. तसेच माहिती देताना गावकर्यांनी देखील विद्यार्थ्यंना उस्फूर्त प्रतिसाद दिला. या सर्वेक्षणात एकूण २५ विद्यार्थांनी सहभाग घेतला व या प्रश्नावालींच्या माध्यमातून १०० घरातील कुटुंबाची माहिती घेतली गेली. मिळालेल्या माहितीच्या आधारे थेऊर गावातील कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक घटकांसंबधी अहवाल तयार केला जाणार आहे. त्याचे काम सर्वेक्षणात सहभागी झालेले विद्यार्थी करत आहे. माहिती लिहून झाल्यानंतर त्याची छपाई केली जाणार आहे.

या संपूर्ण ग्राम सर्वेक्षणाचे नियोजन भूगोल विभागातील प्रा. निखिल आगळे आणि डॉ. ज्योतिराम मोरे यांनी केले तर या संपूर्ण सर्वेक्षणाचे नियोजन व प्रत्यक्ष ग्राम सर्वेक्षण करताना

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गायकवाड  व संस्थेचे प्रकल्प  व्यवस्थापक अधिकारी  मा. श्री. सुरेश (बापू) साळुंके यांचे वेळोवेळी बहुमोल असे सहकार्य लाभले.

**थेऊर ग्राम सर्वेक्षणाचे काही क्षणचित्रे**






६. भूगोल विभागाच्या वतीने तृतीय वर्ष कला शाखेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी **'ग्रामीण समूह विकास'** या विषयाचा ०२ क्रेडिटचा एक्स्ट्रा कॉर्स घेतला.  यामध्ये १२० विद्यार्थी सहभागी झाले.

**प्रा. निखिल आगळे**
भूगोल विभाग

**डॉ ज्योतिराम मोरे**
भूगोल विभाग प्रमुख,